REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणामध्ये बचतगटाचे योगदान एक चिकित्सक अध्ययन (विशेष संदर्भ–महाराष्ट्र राज्य)



डॉ. ममता पाथ्रीकर[1] , प्रा. मनिषा यादव[2]
[1]श्रीमती साळुंकाबाई राऊत महाविद्यालय, वनोजा.
[2]श्री. गाडगे महाराज महाविद्यलाय, मूर्तिजापूर.

## प्रस्तावना :–

महिलांचा सर्व प्रकारच्या शोषणाचे कारण म्हणजे त्यांचे परावलंबत्व होय. आर्थिक दृष्टया कोणताही गट एखादया दुसऱ्या गटावर अवलंबून राहत असेल तर त्या गटाला दुय्यम महत्व प्राप्त होऊन विविध प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागते याला महिला अपवाद नाहीत पुरातन काळापासून महिलांना पुरूषार्थ गाजवून अर्थ कमवण्यापासून दूर ठेवल्यामूळे महिला मोठया प्रमाणावर कुटूंबातील पुरूषावर अवलंबून असलेल्या दिसतात. वैदिक काळात महिलांना आर्थिक अधिकार होते का याची फारशी माहिती होत नाही पण अविवाहीत स्त्रीयांना मात्र वडीलांच्या संपत्तीमध्ये वाटा मिळत होता. उत्तरवैदिक काळ व मध्ययुगीन काळ तसेच आधुनिक काळात महिलांना आपल्या आर्थिक सक्षमीकरणाकरीता संघर्ष करावा लागलेला दिसतो. मनुस्मृतीमध्ये तर स्त्रीला द्रव्य संबोधले असून तिचा कोणत्याही वस्तूवर अधिकार नाही स्त्री ज्याच्या मालकीची त्याचा त्या स्त्रीवर अधिकार सांगण्यात आलेला आहे. कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथामध्ये महिलांना काही आर्थिक अधिकार दिल्याचे दिसते, स्त्रीला पतीकडून पोटगी, संपत्तीचा काही भाग मिळावा याचे विश्लेषण कौटिल्य करताना दिसतो. उत्तरवैदिक काळात स्मृती हाच कायदा असल्याने त्या काळी प्रचलीत स्मृतीनी स्त्रीयाना आर्थिक अधिकारापासून वंचित ठेवल्याचे दिसते स्त्रीचा होणार विवाह किंवा पिंडदानाचा अधिकार स्त्रीयाना नसल्याने त्याना संपत्तीपासून दूर ठेवले असावे असे वाटते. आधुनिक काळात महिलांचे आर्थिक अधिकार प्राप्त करून देण्याचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाते त्यांनी आपल्या हिंदू कोड बीलामध्ये पती व पित्याच्या संपत्तीमध्ये महिलांना अधिकार दिल्याचे दिसते, पण महिलामध्ये राजकीय जागृती व अधिकाराची जागृतीचा अभाव असल्याने महिलांनी हिंदू कोड बीला विरूध्द निदर्शने केल्याचा इतिहास आढळतो. भारत स्वतंत्र झाल्यानंतर राज्यघटनेने महिलांना समान अधिकार देण्याबरोबरच त्यांच्या राजकीय व आर्थिक कर्तृत्वालाही वाव दिला. पंचायत राज्यात महिलांचा राजकीय सहभाग व तो सहभाग कार्यक्षम रहावा म्हणून स्विकारलेली बचतगटाची संकल्पना महिलांच्या राजकीय, आर्थिक व मानसिक सक्षमीकरणास पोषक असलेली दिसून येते. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्याने नवीन मूल्ये रूजवण्याचे कार्य प्राचीन काळापासून झाल्याचे दिसते. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासंदर्भात अभ्यास करण्याकरीता महाराष्ट्र हे घटकराज्य व पंचायत राज्यातील बचत गटाची संकल्पना अभ्यासाकरीता निवडली आहे. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टये पुढील प्रमाणे आहेत.

## संशोधनाची उदिश्टये :–

1. महाराष्ट्रातील पंचायत राज्याचा अभ्यास करणे.
2. महाराष्ट्रातील पंचायत राज्य व महिलाचा राजकीय सहभाग याचा अभ्यास करणे.
3. महाराष्ट्रातील बचत गटांचा अभ्यास करणे.
4. महाराष्ट्रात बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे झालेले आर्थिक सक्षमीकरणचा अभ्यास करणे.
5. महाराष्ट्रातील बचत गटाबाबतच्या सरकारी योजनाचा अभ्यास करणे.

## संशोधनाचे क्षेत्र :–

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र हे महाराष्ट्र या घटक राज्यापूरते मर्यादित असून या माध्यमातून महाराष्ट्रातील पंचायत राज्यात स्विकारण्यात आलेल्या महिला बचत गटाचा अभ्यास करण्यात येईल.

## संशोधनाची गृहितके :–

प्रस्तुत संशोधनाकरीता पुढील गृहितके ठरवण्यात आली आहेत.

1. महाराष्ट्रात पंचायत राज्य संकल्पना यशस्वी झालेली आहे.
2. महाराष्ट्रातील पंचायत राज्यात महिलांचा राजकीय सहभाग मोठया प्रमाणावर आहे.
3. महाराष्ट्रात बचत गटामूळे महिलाचे आर्थिक सक्षमीकरण झालेले आहे.

4. महाराष्ट्रात बचत गटामूळे महिला गृहोद्योग ते उदयोजक बनलेल्या आहेत.
5. महाराष्ट्रात बचत गटासाठी असलेल्या योजना इतर घटकराज्यापेक्षा कमी प्रमाणात आहेत.
6. महाराष्ट्रातील बचत गट संकल्पनेमूळे माहिला नेतृत्वाचा विकास झाला.

### म्हाराष्ट्रातील पंचायती राज व महिलांचा राजकीय सहभाग :—

1961 मध्ये महाराष्ट्रात वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली पंचायतराज्यासंबंधी शिफारशी सूचवण्याकरीता एक समिती नेमण्यात आली या समितीने 1957 च्या बळवंतराव मेहता समितीच्या अहवाला वरुन पंचायत राज्याकरीता काही शिफारशी सूचवल्या त्यानुसार महाराष्ट्रात 1 मे 1965 पासून स्त्रीस्तरीय पंचायत राज्य जिल्हापरिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निर्माण करण्यात आली. 1993—94 मध्ये पी.व्ही. नरसिंहराव काळात केंद्र सरकारने 73 वी 74 वी घटनादुरुस्ती करुन महिलांना 33 टक्के जागावरती आरक्षण दिले त्याआधी राजीव गांधीनी महिलांना पंचायत राज्या आरक्षण असणारे विधेयक तयार केले होते. पण तांत्रिक अडचणीमूळे ते पास होउ शकले नाही.

महाराष्ट्रामध्ये 73 व्या 74 व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने शरद पवार सरकारच्या काळात महिलांना अनुसूचित जाती, जनजाती मागासवर्गीय महिलांना आरक्षण मिळाल्यामूळे त्याचा राजकारणातील सहभाग वाढला. त्यामूळे महिलामध्ये नेतृत्वगुण विकसीत होउन त्यांच्या आत्मविश्वासात भर पडली.

10 नोव्हेबर 1986 मध्ये शेतकरी संघटनेचे चांदवड येथे अधिवेशन भरले तिथे भव्य महिला परिषद घेण्यात आली होती. त्या परिषदेत महिलांनी पंचायत राज्यातील निवडणूक लढवण्यावर भर देण्यात आला होता. शेतकरी संघटनेच्या महिलांनी 1989 च्या पंचायत राज्यातील निवडणूक लढवून आपली सत्ता प्रस्थापित केली, महाराष्ट्रातील पंचायत राज्यातील महिलामध्ये निर्णय निर्णाधारण क्षमता वाढावी याकरीता त्यांना प्रशिक्षणे देण्यात आली तसेच अनेक अभ्यास शिबिराच्या माध्यमातून प्रशासनाचे ज्ञान देण्यात आले यामध्ये महिला राजसत्ता आंदोलन, मंडलीक ट्रस्ट, आलोचना, यशदा या संस्थाचा सहभाग होता. महिलांचा पंचायत राज्यात सहभाग वाढल्यानंतर पाणी, स्वच्छता, दारू, आरोग्य, शिक्षण हे प्रश्न महिलांनी यशस्वीपणे सोडवले ग्रामसभा यशस्वीपणे वेळेवर होउ लागल्या. महाराष्ट्रात महिलांच्या विकासाला पंचायत राज्यात महत्व असून त्यानूसार ग्राम पंचायतीच्या अनिवार्य कामाकरीता जेवढे रुपये खर्च होतात. त्याच्या 10 टक्के निधी महिलावर खर्च व्हावा अशी अट पंचायत राज्यात आहे तसेच महाराष्ट्रात जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण समितीत 70 टक्के महिला असल्यात तसेच अध्यक्ष महिला असावी अशी उपायोजना केलेली दिसते. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थामधील सरपंच, पंचायत समिती अध्यक्ष, जिल्हा परिशद अध्यक्ष, नगराध्यक्ष, महापौर इत्यादी पदे महिलासाठी आरक्षित आहेत त्याच बरोबर पंचायत राज्यात महिलांना 50 टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

### म्हाराष्ट्रातील बचत गट संकल्पना व महिला सक्षमीकरण :—

बंगलादेशाचे नोबेल पूरस्कार प्राप्त महंमद युनूस यांनी यशस्वीपणे राबवलेली बचत गटाची संकल्पना महाराष्ट्रात महिलांच्या राजकीय सक्षमीकरणानंतर त्यांच्यामध्ये आर्थिक सक्षमीकरण यावे या दृष्टीने राबवलेली दिसते. 'काही महिलांचा तसेच पुरुषाचा महिण्याला ठराविक बचत करणारा स्वतःच स्वतःला सहाय करणारा स्वयंनिर्मित गट म्हणजे बचत गट होय.' बचत गट हे स्त्री पुरुष दोघेही निर्माण करु शकतात, पण महिलांचा बचत गट असणे व तो महिलांनी चालवणे सोयीचे ठरते कारण यामध्ये पुरुषाचा समावेश झाला तर तो महिला वर्चस्व गाजवू शकतात, त्यामुळे महिलाच्या सक्षमीकरणा ऐवजी पुरुषसत्ताक व्यवस्थेचे महत्व आधोरिखीत होईल म्हणून महिलांनी आपल्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलाचे महिलांनी तयार केलेले बचत गट महत्वाचे ठरतात म्हणूनच महिलांनी महिलामार्फत चालवलेला बचत करणारा गट म्हणजे महिलांचा बचत गट म्हणता येईल. महिला बचत गट महाराष्ट्रात दोन दशकापासून सुरु असून त्याव्दारे स्वयंसहाय समूहाव्दारे महिला स्वयंपुर्ण होताना दिसत आहेत. महिलांच्या विविध बचत गटांनी गृहउद्योग पासून व्यवसायात उदयोजक बनण्यापर्यतचा प्रवास केलेला दिसतो. या बचत गटामूळे आम्ही महिला ही काही तरी करु शकतो ही भावना महिला मध्ये निर्माण झाल्याने बचत गटाचे काम महिला जिद्दीने मेहनतीने पूर्ण करतात दिसून येतात. महिला हया कुटूंबाचा आधार असून त्याच्या राहणीमान बरोबरच कुटूंब, समाज, राष्ट्राचे राहणीमान उंचवण्याकरीता बचत गट व स्वयंरोजगार संकल्पना निर्माण झाल्याचे दिसते.

महाराष्ट्रामध्ये बचत गटाची संख्या 11 लाख एवढी असून महिलांच्या सक्षमीकरणात बचत गट हे मैलाचा दगड असलेले दिसतात सुरवातीला लोणची, पापड करणाऱ्या महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उदयोजक बनलेल्या दिसून आल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून महिला परावलंबी जीवनाचा त्याग करुन स्वावलंबित्वाचे आकाश पेलताना दिसून येत आहेत. बचत गटाचे प्रामुख्याने महिलांचे व पुरुषाचे असे बचत गट आहेत. यामध्ये दिव्यांग व्यक्ती सुध्दा बचत गट तयार करु शकतात. बचत गट हे आर्थिक दृष्टया कमकुवत वर्गातील लोकांकरीता असले तरी ABL बचत गट व BPL बचत गट देखील कार्य करताना दिसतात. DRDA सारख्या संख्या महिलाना अगरबत्ती, फिनेल तयार, करण्याचे प्रशिक्षण देतात. मविम, कृषी विज्ञान केंद्र (KVK) DRDA(District rural development agency) या सरकारी संस्था बचत गटांना मदत करतात इतर NGO (स्वयंसेवी संघटना) सुध्दा बचत गटांना मदत करु शकतात. महाराष्ट्रात पहिला महिला बचत गट 1947 मध्ये अमरावती मध्ये सासू सुन यांनी मिळून महिण्याला 25 पैसे बचत करुन निर्माण केला होता. सन 1984 मध्ये वडसा, गडचिरोली तालुक्यात दूसरा बचत गट निर्माण झाला. सन 1958 मध्ये चैतन्य ग्रामीण महिला बालयुवक संस्था पुणेचा समावेश होतो. भारत सरकारने 1999 मध्ये स्वर्ण जयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजनेच्या माध्यमातून बचत गटाना प्रोत्साहीत केले. स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना त्यानंतरच्या (NURM, NRLM) खादी ग्रामोउदयोग मंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, शहरी

आदिवासी वित्त विकास महामंडळ, नाबार्ड, MITCON यामाध्यमातून बचत गटाना मदत केले जाते. भारतात सन 1998 पासून केंद्रिय अर्थसंकल्पामध्ये बचत गटांना बॅकानी दयावयाच्या कर्जासबंधी तरतूद करण्यात आली आहे. त्याच बरोबर केंद्र व राज्य सरकार बचत गटाना मदत करतात महाराष्ट्रात बचत गटाकरीता मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले असून त्याव्दारे जास्तीत जास्त बचत गट निर्मितीस विविध योजनाव्दारे प्रोत्साहन दिले आहे.

### बचत गटाकरीता काम करणा–या संस्था :–

महाराष्ट्रात बचत गटासाठी पुढील संस्था कार्य करतात.

1. चैतन्य पुणे
2. संपूर्ण बांबू अमरावती
3. ज्ञानप्रबोधिनी पुणे
4. आम्ही आमच्या आरोग्यासाठी गडचिरोली
5. माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठाण सोलापूर
6. स्वरुपवर्धिनी पुणे
7. स्वयंसिध्दा मुंबई

आर्थिक दृष्टया दुर्बल गटातील महिलांमधील कौशल्य वाढवून त्याची उत्पादकता तयार करण्याकरीता उपयोजना तयार करण्यात आली आहे. राष्ट्रीय महिला कोष, रमाई महिला सक्षमीकरण योजना, स्वावलबंन, स्वयमंसिध्दा, Tribal Development Project महिला बचत गटाकरीता कार्य करतात. बचत गटामूळे महिलांना स्वयंरोजगार मिळाला आहे.

### महिला बचत गट व बाजारपेठ :–

महिलांच्या बचत गटातील गृहउद्योगाना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे कार्य देखील पंचायत राज्यात होताना दिसते. ग्रामपंचायत, पंचायत समिती जिल्हा परिषद क्षेत्रातील काही दुकान गाळे बचत गटाच्या महिलांना आरक्षित ठेवण्याची तरतूद असून महिलांनी उत्पादीत केलेल्या मालास बाजारपेठ मिळावी म्हणून जिल्हा, तालुका स्तरावर प्रदर्शने, मेळावे भरवले जातात. महाराष्ट्रात बचत गटाच्या खरेदी करिता 'लक्ष्मी सरस' प्रदर्शने, मुंबईत भरवली जातात. त्याच बरोबर महिलांना ऑनलाईन विक्रीचे दालन मिळावे म्हणून 'महिला ई हाट' पोर्टल सरकारने उपलब्ध करुन दिले आहे. 'उमेद' सारख्या योजना मूळे महिलांचे बचत गट स्वयंरोजगाराच्या वाटा शोधताना दिसतात. महाराष्ट्रात महिला उद्योजकता धोरण जाहीर झाले असून या माध्यमातून महिला उद्योजकाना वीज युनीट मागे 1 ते 2 रुपये सूट देण्यात आली आहे. तसेच प्रदर्शनाच्या ठिकाणी भाडयामध्ये 75 टक्के सुट देण्याचे धोरण स्विकारले आहे. श्रीमती सुमतीबाई सुकळीकर योजनेच्या माध्यमातून महिला बवत गटाला शुन्य टक्के व्याजाने कर्ज मिळते.

महाराष्ट्रातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात बचत गट महत्वाचे ठरले असून त्यामूळे शहरी व ग्रामीण महिलेचा चेहरा मोहरा बदलेला दिसतो बचतगटामूळे महिलामध्ये आलेले आर्थिक, मानसिक सक्षमीकरण हे काही प्रमाणात राजकीय सहभागाकडे व नेतृत्वाकडे नेताना दिसून येते.

### निष्कर्ष :–

महाराष्ट्रातील पंचायत राज्यात राबवण्यात आलेल्या बचत गटाच्या संकल्पनेमूळे महिलाचा आत्मविश्वास जागृत होउन कुंटूबातून उद्योगाकडे तसेच राजकारणात महिलांनी घेतलेली झेप ही केवळ बचत गटामूळे दिसते, यावरुन महाराष्ट्रात महिला बचत गट हे महिला सक्षमीकरणासाठी राजमार्ग बनलेले दिसतात. त्यामूळे बहुतांश महिला आर्थिक दृष्टया सक्षम बनल्या.. बचत गटातून स्वयंरोजगार मिळाल्यामूळे महिला मधील परावलंबत्वाची भावना नाहीसी झाली. महिला या कुंटूबाचा आधार असल्याने घर व शेतीशी निगडीत व्यवसाय बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी केल्याने महिलांची आर्थिक प्रगती झाली. पण बहुतांश महिला बचत गटांना बॅकाकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याचेही दिसते नाबार्ड व शासन बचत गटांना अर्थ उपलब्ध करुन देत असले तरी ते पुरेसे असलेले दिसत नाही. महिला बचत गटांना कायम स्वरुपी बाजारपेठ नसल्याने बचत गटांना उत्पादीत माल विक्री करिता हंगामी प्रदर्शनाचा आधार घ्यावा लागतो.

### संदर्भ :–


1. भारतीय घटनात्मक तरतूदी आणि स्थानिक स्वशासन – रा.ज. लोटे, पिंपळापूरे प्रकाशन नागपूर, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर 2017.
2. भारताचे शासन आणि राजकारण – डॉ. भा.ल. भोळे, पिंपळपूरे ॲण्ड कं. पब्लीशर्स नागपूर, पहिली आवृत्ती जून 2003.
3. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण – प्रा.डॉ. अशोक नाईकवाडे, प्रा.डॉ. पंडित नलावडे, कैलास पब्लीकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती जुलै 2013.
4. लोकसत्ता – 4 एप्रिल 2018.
5. महिला स्वयंरोजगार –रविंद्र मधुकर काटोले, प्रथम आवृत्ती मार्च 2006 गोडवा कृषी प्रकाशन पुणे.
6. बचतगटांसाठी स्वयंरोजगार 57 महामार्ग एस.बी. पवार, शुभम बहुउद्देशीय मार्गदर्शन संस्था पुणे, प्रथम आवृत्ती 15 ऑ. 2009.
7. लोकराज्य – 8 मार्च 2018, महिलादिन विशेषांक.

8. म.वि.म. अमरावती
9. Online accessed swayam sidha foundation Mumbai.
10. Online accessed Nabard Mumbai NRLM.
11. Online accessed SHG in Maharashtra.